# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः27.08.2026** **वारःगुरुवार**

---

1. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता युवकांना संबोधित करणार.
2. चाकण-भोसरी औद्योगिक पट्ट्यात 2 हजार 320 कोटींहून अधिक गुंतवणूक प्रस्तावित.
3. MPSC पेपरफुटी प्रकरणी मुंबई पोलिसांकडून सहा जणांना अटक.
4. नेपाळमध्ये आलेल्या पुरामुळे अडकलेल्या पर्यटकांमध्ये शेकडो भारतीयांचा समावेश, राज्यातील नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी. आणि,
5. श्रीलंकेला फॉलोऑन दिल्यानंतर कोलंबो कसोटीत भारताला विजयाची संधी.

**<u>क्रीडा दिन</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता दूरदृश्य प्रणालीद्वारे देशभरातील युवकांशी 'खेलो इंडिया डायलॉग'च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमाचा हा भाग असून, 'माय भारत'च्या वतीने याचं आयोजन करण्यात आलं आहे. दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून 1600 ठिकाणांवरील 8 लाखांहून अधिक युवकांना ते संबोधित करणार आहेत. भारताच्या 2036 ऑलिम्पिक यजमानपदाच्या दाव्याच्या पार्श्वभूमीवर, युवकांना देशाच्या क्रीडा वाटचालीच्या केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न या संवादातून केला जाणार आहे. मुंबईत आयआयटी पवई इथं केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत तर पुण्यात केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे भुसावळ इथं उपस्थित राहणार आहेत.

**<u>चाकण भोसरी</u>**

चाकण-भोसरी औद्योगिक पट्ट्यातील 49 सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांशी करण्यात आलेल्या सामंजस्य करारांतून 2 हजार 320 कोटी 97 लाख रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या गुंतवणुकीमुळे उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊन पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. पुण्यातील ऑटोमोबाईल आणि अभियांत्रिकी उद्योगांच्या विकासात एमएसएमई क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असल्याचं मुख्यमंत्र्यांनी काल मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात बोलताना सांगितलं. दरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी उच्चस्तरीय समिती तसेच तक्रार निवारण कक्ष कामकाजाचा आढावा घेतला.

**<u>सायबर फसवणूक</u>**

'डिजिटल अरेस्ट' सारखा कोणताही प्रकार अस्तित्वात नसून सायबर फसवणूक झाल्यास नागरिकांनी तातडीने 1930 या क्रमांकावर तत्काळ संपर्क साधावा असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. महाराष्ट्र सायबरच्या वतीनं मुंबईत आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'डिजिटल अरेस्ट' या सायबर जनजागृती लघुपटाचं आणि '1930 महाराष्ट्र सायबर अँथम'चं लोकार्पण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. सायबर फसवणुकीनंतरचे सुरुवातीचे काही तास अत्यंत महत्त्वाचे असून, या काळात तक्रार नोंदविल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याची किंवा परत मिळविण्याची शक्यता अधिक असते. याबाबत अधिक माहिती देताना फडणवीस म्हणाले...

***याच्यातला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की चांगल्या पद्धतीनं आपण पैसे लोकांचे वापस करतो आहोत तरीही आज लोकं रिपोर्ट करायला इतका काळ लावतात. अनेक केसेस मध्ये तीन-तीन दिवसांनी लोकं रिपोर्ट करतात काही केसेस मध्ये पंधरा दिवसांनी करतात आणि मग त्यांचे दहा बारा टक्क्यांच्यावर पैसे रिकव्हर होत नाहीत. कारण त्या पैशाची अशी विल्हेवाट लागलेली असते की ते परत येत नाहीत आणि म्हणून लोकं मधला भय दूर करून संपर्क तुम्ही त्वरित करा. काही असलं तरी त्यांनी त्याच्यावर कॉल केला पाहिजे. लोकांना एक फिलिंग आपल्याला देता आला पाहिजे. जसं आता खूप चांगला सायबर एजंट आपण तयार केलेला आहे बोट तयार केलाय कि जो लोकांशी चर्चा करेल. सो लोकांना या नंबरवर फोन करायला भीती पण वाटली नाही पाहिजे आणि संकोचही वाटला नाही पाहिजे.***

यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी आणि सायबर अँथम' मध्ये सहभागी झालेले चित्रपट कलाकार उपस्थित होते.

**विद्यार्थी चष्मे**

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या अनुषंगानं शासनाच्या शालेय शिक्षण विभागानं दोन संस्थांशी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या तपासणीत दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत काल मुंबईत हा करार करण्यात आला. या माध्यमातून 20 लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्या ची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

**MPSC पेपरफुटी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक परीक्षेतल्या पेपरफुटी प्रकरणी मुंबई पोलिसांनी एकंदर 6 जणांना अटक केली आहे. अटक झालेल्यांमध्ये MPSC च्या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. न्यायालयानं या सर्व आरोपींना बुधवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी MPSC च्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

**रक्षाबंधन**

अनाथ तसंच दिव्यांग मुली आणि महिला स्वच्छता कर्मचारी यांसह विविध क्षेत्रातील महिलांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना काल रक्षाबंधनानिमित्त राखी बांधली. रक्षाबंधन हा समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारा पवित्र सण आहे. समाजाच्या विविध स्तरावर उल्लेखनीय योगदान देत असलेल्या महिला तसंच मुलींबरोबर यंदा रक्षाबंधन केल्यानं आनंद झाल्याची भावना राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

**ईद-ए-मिलाद**

संपूर्ण राज्यभर प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती अर्थात ईद-ए-मिलाद-उन-नबीचा सण उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त मुस्लिम धर्मीयांनी ठिकठिकाणी सामूहिक नमाजपठण केलं. सांगली, मिरज, नागपूर, धुळे, नंदुरबार ,नाशिक ,कोल्हापूर आणि बीड इथं मुस्लिम समाजाच्यावतीने भव्य मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. तर लातूर इथं या निमित्त रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं.

**कांदा पाठवणी**

कांदा दर स्थिरीकरण योजनेअंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफने खरेदी केलेला सुमारे साडेचारशे मेट्रिक कांदा काल नाशिक जिल्ह्यातील लासलगाव इथून विशेष रेल्वेनं दिल्लीला रवाना झाला. केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या वतीनं शहरी भागातील ग्राहकांना रास्त दरात कांदे उपलब्ध करून देण्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली होती. दरम्यान, बाजारात सध्या कांद्याला चांगला भाव मिळत असल्यानं कांद्याचे भाव पाडण्यासाठी केंद्र सरकार बाजारात कांदा आणत असल्याचा आरोप करत

प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीनं ठिय्या आंदोलन करण्यात आलं. पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर ही रेल्वे रवाना झाली.

**शिष्यवृत्ती**

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीमध्ये शिकणाऱ्या 100 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय नेटफ्लिक्सनं घेतला आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात 80 टक्क्यांपर्यंत मदत दिली जाणार आहे. 1 वर्ष कालावधीचे 2 पदविका अभ्यासक्रम आणि 6 महिने कालावधीच्या 4 प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

**रुग्णालय भेट**

अमरावती इथं अलीकडेच घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी काल कुडाळ येथील महिला आणि बाल रुग्णालयाला भेट देऊन रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थितीतील तयारीचा आढावा घेतला. अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन मार्ग, विद्युत व्यवस्था, ऑक्सिजन सुविधा तसेच रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची त्यांनी पाहणी केली.

**अंमली पदार्थ नष्ट**

पुणे पोलिसांनी विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला सुमारे 4 कोटी 12 लाख रुपये किमतीचा सुमारे 455 किलो अमली पदार्थांचा साठारांजणगाव एमआयडीसीतील शासन नियुक्त कारखान्यात कायदेशीर प्रक्रियेद्वारे नष्ट केला. 23 पोलिस ठाण्यांतील 123 एनडीपीएस गुन्ह्यांमध्ये जप्त गांजा, एमडी, मेथाम्फेटामाईन, हेरॉईन, चरस यांचा समावेश आहे. केंद्राच्या 'ड्रगमुक्त भारत' अभियानांतर्गत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

**नेपाळ**

नेपाळमध्ये काल आलेल्या भीषण पुरात सुमारे 160 लोकांचा मृत्यू झाला असून, 133 भारतीय नागरिकांसह 750 हून अधिक लोक बेपत्ता आहेत. नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातल्या नागरिकांना तातडीनं आवश्यक ती मदत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं विशेष लिंक उपलब्ध केली आहे. तसंच अधिक माहितीसाठी 1077 या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन प्राधिकरणानं केलं आहे. दरम्यान, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले राज्यातले चार नागरिक तिबेटमधील जिलोंग अर्थात केरुंग शहरात अडकले असून त्यातील दोन महिलांची प्रकृती बिघडली आहे. पुरामुळे नेपाळ सीमेवरील इमिग्रेशन कार्यालय वाहून गेल्याने नेपाळमध्ये जाणारा रस्ता बंद झाला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंकेदरम्यान कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्याच्या काल चौथ्या दिवसअखेर श्रीलंका संघाच्या दुसऱ्या डावात 6 बाद 229 धावा झाल्या आहेत. पासिंदू सुरिया बंडारानं 92 तर कामिंदू मेंडिसने 55 धावा केल्या. फॉलोऑन नंतर श्रीलंकेकडं 16 धावांची आघाडी आहे. तत्पूर्वी यजमान संघाचा पहिला डाव 290 धावांवर संपुष्टात आला. आज सामन्याचा शेवटचा दिवस आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.